प्रधानमंत्री पीक विमा योजना - खरीप हंगाम २०१७
मध्ये राबविण्यास मुदतवाढ देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्र. प्रपीवियो -२०१७/प्र.क्र. १/११-अे**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : १ ऑगस्ट, २०१७**

वाचा :-

१.केंद्र शासनाची प्रशासकीय मान्यता, १३०१५/०३/२०१६/क्रेडिट २, दिनांक २३.०२.२०१७ व मार्गदर्शक सुचना.
२. शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. प्रपीवियो-२०१७/प्र.क्र. १/११-अे, दिनांक.२०.६.२०१७
३. शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र.प्रपीवियो पुरक-२०१७/प्र.क्र.१/११-अे, दिनांक २३.६.२०१७
४. शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. प्रपीवियो -२०१७/प्र.क्र. १/११-अे, दिनांक.०१.०८.२०१७
५. कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. १३०१२/०४/२०१७- CR II (FTS No ५११२३) दि.०१.०८.२०१७

**शासन निर्णय पुरकपत्र :**

खरीप हंगाम २०१७ मध्ये राज्यात प्रधानमंत्री पिक विमा योजना संदर्भ क्र २ व ३ अनुसार अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी राबविण्यात येत आहे. त्यानुसार या योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०१७ करिता शेतकरी सहभागाची अंतिम मुदत दि.३१ जुलै, २०१७ अशी आहे. तथापि, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार अर्ज भरण्यामध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी लक्षात घेता सदर योजनेमध्ये शेतकऱ्यांनी सहभागी होण्याची मुदत वाढविण्याबाबत शासनाकडे प्राप्त झालेल्या विनंत्यांच्या अनुषंगाने शासनाने शेतकऱ्यांच्या सहभागाची मुदत दि.०५.०८.२०१७ पर्यंत वाढविण्याचा निर्णय दि.०१.०८.२०१७ रोजी निर्गमित केला आहे.

पीक विमा योजनेतील शेतकऱ्यांच्या सहभागाची मुदत वाढविण्यासंबंधी यापूर्वी केंद्र शासनाकडे केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने त्यांच्या संदर्भ क्र. ५ येथील पत्राने योजनेतील बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी सहभागाची मुदत खालील अटी व शर्तीवर दि.०४.०८.२०१७ पर्यंत (म्हणजेच दि.०४.०८.२०१७ सह) वाढविण्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे.

१) प्रस्तुत मुदतवाढ केवळ बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठीच देण्यात आली आहे.

२) मुदतवाढीच्या कालावधीदरम्यान केवळ ऑनलाईन पध्दतीने www.agri-insurance.gov.in या पोर्टलवर जनसुविधा केंद्राच्या माध्यमातून अथवा स्वत: शेतकऱ्यांनी थेट भरलेले अर्जच मान्य करण्यात येतील.

३) अर्जदार शेतकऱ्यांकडील पीक पेरणी प्रमाणपत्र दि. ३१.०७.२०१७ अथवा त्यापूर्वीचे असणे आवश्यक आहे.

४) मुदतवाढीच्या कालावधीत दाखल करण्यात आलेल्या अर्जांबाबतची माहिती स्वतंत्रपणे ठेवण्यात यावी.

केंद्र शासनाचा वरीलप्रमाणे निर्णय लक्षात घेता उपरोक्त अनुक्रमांक ४ येथील शासन निर्णय पूरकपत्र अधिक्रमित करुन प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०१७ मध्ये बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी सहभागी होण्याची मुदत केंद्र शासनाने विहित केलेल्या उपरोक्त अटी व शर्तींवर दि.०४.०८.२०१७ पर्यंत वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०८०२११३९५९२४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे **राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

Sharad Balkrishna Pawaskar

Digitally signed by Sharad Balkrishna Pawaskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f4ebb91d526d59e93b9365fba816854d2dfa38e53ed59ae4b31ba8260ba52882, cn=Sharad Balkrishna Pawaskar
Date: 2017.08.02 13:52:00 +05'30'

**(श.बा.पावसकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
२. मा. मंत्री (कृषि ) यांचे खाजगी सचिव.
३. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव.
४. सचिव, कृषि मंत्रालय, कृषि, शेतकरी कल्याण व सहकार विभाग, कृषि भवन, नवी दिल्ली.
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२.
६. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७. प्रधान सचिव (महसूल) महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०. अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
११. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ (५ प्रती).
१२. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
१३. अध्यक्ष व कार्यकारी संचालक, भारतीय कृषि विमा कंपनी, १३ वा मजला, अंबादिप बिल्डिंग, कस्तुरबा गांधी मार्ग, कॅनॉट प्लेस, नवी दिल्ली.
१४. विभागीय आयुक्त (सर्व)
१५. जिल्हाधिकारी (सर्व)
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१७. कृषि संचालक, (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, म.रा., पुणे
१८. महानिदेशक, माहीती व प्रसिध्दी विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ (प्रसिध्दीकरिता)
१९. अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१

२०. विमा संचालक, म्हाडा बिल्डींग, पहीला मजला, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१
२१. महालेखापाल, महाराष्ट्र, १/२, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
२२. विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी मर्यादित, नवीन स्टॉक एक्सचेंज बिल्डींग, २० वा मजला, दलाल स्ट्रीट, मुंबई-४०० ०२३.
२३.व्यवस्थापक, रिलायंस जनरल इन्शुरन्स कंपनी लि. वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, ५ वा मजला, चिंतामणी अव्हेन्यू, विरानी औदयोगीक वसाहती जवळ, गोरेगाव (पू.), मुंबई-४०००६३.
२४.व्यवस्थापक, नॅशनल इंशुरंस कं. लि., मंडल कार्यालय, ३ रा मजला, स्टलिंग सिनेमा बिल्डिंग, ६५, मर्झबान रोड, मुंबई, ४००००१
२५.व्यवस्थापक, ओरीएंटल इंशुरंस कं. लि., मेफेयर टॉवर्स, पुणे-मुंबई रोड, वाकडेवाडी - पुणे ४११००५
२६. व्यवस्थापक, दि. युनायटेड इंडिया इंशुरंस कं. लि., प्रादेशिक कार्यालय, ५ वा मजला, भारती विद्यापीठ भवन, लालबहादुर शास्त्री मार्ग, नवी पेठ पुणे ४११०३०
२७.सरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, ९ नगिनदास स्ट्रीट, मुंबई-४०० ०२३
२८. मुख्य अधिकारी, सेन्ट्रल फायनान्स एजंसी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, ९ नगिनदास स्ट्रीट, मुंबई-२३
२९. सहायक महाप्रबंधक, रुरल प्लॅनींग अँड क्रेडिट डीपार्टमेंट, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, न्यू सेन्ट्रल ऑफीस, फोर्ट, मुंबई- ४०० ००१
३०. व्यवस्थापक, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, रिजनल ऑफीस, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०० ०१८
३१. सरव्यवस्थापक, नाबार्ड, पुनम चेंबर्स, शिवसागर इस्टेट, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०० ०१८
३२. उप सरव्यवस्थापक, नाबार्ड, ५४ वेलस्ली रोड, शिवाजी नगर, पुणे-४११ ००५.
३३. उप सरव्यवस्थापक, एस.एल.बी.सी., बँक ऑफ महाराष्ट्र, १५०१, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५.
३४. व्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, (सर्व).
३५. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व).
३६. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ (५ प्रती).
३७. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व).
३८. विभागीय सांख्यिक, व्दारा - विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय (सर्व).
३९. सह सचिव (११-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४०. क्रेडिट स्पेशालिस्ट, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४१. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
४२. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
४३. अधिदान व लेखाधिकारी, लेखा व कोषागारे संचालनालय, मंबई ३२.
४४. सर्व विधानसभा सदस्य.
४५. सर्व विधानपरिषद सदस्य.
४६.निवड नस्ती, कार्यासन ११-अे.